### ८) नूतन झेला :



१) देठासहित आंबे काढता येतात.
२) फांद्यांना हिंदोळा बसत नाही.
३) काढणीच्या वेळी फळे पडत नाहीत.
४) वापरण्यास सुलभ असून वजनास हलका आहे.
५) अंदाजे किंमत रू. ९५/- प्रति नग आहे.

### ९) अमर बांडगूळ काढणी :



१) बांडगुळे असलेल्या फांद्या जमिनीवरून कापता येतात.
२) झाडाच्या फांद्या पिंजत नाही.
३) झाडावरील वेली काढण्यासाठी हुकाची योजना आहे.
४) अंदाजे किंमत रू. १५५/- प्रति नग आहे.

### १०) नारळ सोलणी यंत्र

१) नारळ सोलण्यासाठी उपयोग होतो.
२) एका दिवसात २५० ते ३०० नारळ सोलून होतात.
३) पारंपारिक पद्धतीने ५० ते ६० नारळ सोलले जातात. त्यापेक्षा या यंत्राने ४ ते ५ पट जास्त नारळ सोलता येतात.
४) या यंत्राची अंदाजे किंमत रू. २००/- प्रति नग आहे.

### ११) नवीन टोकण यंत्र



१) या नविन टोकण यंत्राच्या सहाय्याने महिलांना उभे राहून तूर, भुईमूग या बियाण्यांची लागवड करता येते.
२) या यंत्राच्या सहाय्याने बी जमिनीत खोलवर पडते.
३) या यंत्राच्या सहाय्याने ३५ टक्के मजुरांची बचत होते.
४) या यंत्राची अंदाजे किंमत रू. २५०/- प्रति नग आहे.

### १२) सायकल कोळपे



१) एक स्त्री किंवा मनुष्य चालवू शकते.
२) वजन अंदाजे ५ किलो आहे.
३) एक स्त्री एका दिवसात अंदाजे एक एकर क्षेत्राची कोळपणी करू शकतो.
४) वापरण्यास अत्यंत सोपे असून हलके असल्याने वाहतुकीस सुलभ आहे.
५) या यंत्रामुळे शारीरिक कष्ट कमी होऊन रोजगार निर्मिती होते.
६) याची अंदाजे किंमत रु. ६००/- प्रति नग आहे.

### १३) पोते भरण्याची चौकट :



१) या चौकटीचा पोते भरण्यासाठी उपयोग होतो.
२) ही चौकट उभी असून त्याला पाहिजे त्या आकाराचे पोते अडकवले जाते.
३) या चौकटीच्या सहाय्याने एकच व्यक्ती कमीत कमी वेळात व श्रमात धान्याचे पोते भरू शकते.
४) या यंत्राची अंदाजे किंमत ६००/- रू. प्रति नग आहे.


संपादक व प्रकाशक
**डॉ. ला. रा. तांबडे**
कार्यक्रम समन्वयक



लेखक
**सौ. अनिता शेळके**
विषय विशेषज्ञ (गृहविज्ञान)
**डॉ. ला. रा. तांबडे**
कार्यक्रम समन्वयक



तांत्रिक साहाय्य
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

प्रकाशन वर्ष : २००८ घडी पुस्तिका क्र. : १५


(S.K.P.) (I.C.A.R.)

# ग्रामीण महिलांसाठी सुधारित शेती अवजारे



## कृषी विज्ञान केंद्र, सोलापूर


सोलापूर–बार्शी रोड, मु. खेड, पो. केगाव,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर (महाराष्ट्र)
फोन : ०२१७ – २३५०३५९

## ग्रामीण महिलांसाठी सुधारित शेती अवजारे

शेतीमध्ये महिलांचे योगदान मोठ्या प्रमाणावर आहे. शेतीतील विविध कष्टप्रवण कामे महिलांना करावी लागतात. ही सर्व कामे जास्तीत जास्त वेळ व मानवी ऊर्जा लागणारी आहेत. शेतकरी महिला खूपच कमी प्रमाणात शेती अवजारांचा वापर करताना दिसून येतात. यामुळे त्यांना थकवा जाणवतो व कामाचे प्रमाणही कमी होते. शेतीतील विविध कामे करत असताना महिलांची शारीरिक स्थिती अनैसर्गिक होते. त्यामुळे पाठीचे मानेचे आजार महिलांमध्ये दिसून आले आहेत.

शेतीकामातील थकवा हा जास्तीत जास्त शारीरिक दगदगीमुळे जाणवतो. यासाठी शेतीची सुधारित अवजारे वापरली तर बराच शारीरिक ताण कमी होतो. विविध शेती कामातील अवजारे तयार करताना महिलांचे शारीरिक मापदंड घेतली जातात. त्यामुळे सुधारित अवजारे वापरण्याने कामाची गती वाढून कामे सुखकर होतात. वेळ, शक्ती व पैसा यांची बचत होऊन कामाची प्रत सुधारते. ग्रामीण महिलांसाठी तयार करण्यात आलेल्या विविध कृषि अवजारांची येथे अंदाजे किंमत, वजन व वापरण्याची पद्धत देत आहोत.

### १) भेंडी तोडणी कात्री :



१) भेंडी फळे तोडण्यासाठी याचा उपयोग होतो.

२) एका दिवसात एक महिला ५० ते ६० किलो भेंडी तोडते.

३) भेंडी तोडता लव टोचत नाहीत.

४) तोडणीचे काम पारंपारिक पद्धतीपेक्षा दुपटीने होते.

५) या कात्रीची अंदाजे किंमत रू. ४५/- प्रति नग आहे.

### २) मका सोलणी यंत्र :



१) वाळलेल्या मक्याची दाणे काढण्यासाठी उपयोग होतो.

२) एक मजुर २०० किलो मक्याची कणसे एका दिवसात सोलतो.

३) यंत्र आकाराने लहान व वजनाने हलके असते त्यामुळे हातात सहजपणे जास्त श्रम न पडता धरता येते.

४) लहान प्रमाणावर मका सोलण्यासाठी फार उपयोगी आहे.

५) या यंत्राची अंदाजे किंमत रू. ५०/- प्रति नग आहे.

### ३) वैभव विळा :



१) गहू, ज्वारी, गवत इत्यादींची कापणी जमिनीलगत करता येते.

२) दातेरी पात्यामुळे धार लावावी लागत नाही.

३) वजनास हलका आणि अधिक चांगली पकड असून समतोल साधून सहज कापणी होते.

४) एका तासामध्ये १ गुंठ्याची कापणी करता येते.

५) वैभव विळ्याची अंदाजे किंमत रु. ५०/- प्रति नग प्रमाणे आहे.

### ४) सुधारीत विळा :



१) शेतातील तण काढण्यासाठी व गवत कापण्यासाठी या विळ्याचा उपयोग होतो.

२) खुरपणे व कापणी हे दोन्ही कामे एकाच अवजाराने केली जातात.

३) आतील बाजूने विळ्याचे काम करता येते. बाहेरून खुरपण्यासाठी वापरत येते.

४) या विळ्याची मूठ व आकार हाताळण्यास सोपे आहे.

५) या विळ्याची अंदाजे किंमत रू. ५०/- प्रति नग आहे.

### ५) भूईमूग शेंगा फोडणी यंत्र :-



१) भूईमूग शेंगा फोडण्यासाठी याचा उपयोग होतो.

२) या यंत्राच्या सहाय्याने भूईमूगाच्या शेंगापासून दाणे व टरफले वेगळी केली जातात.

३) एका दिवसात या यंत्राच्या सहाय्याने एक व्यक्ती ६५ ते ७० किलो शेंगा सहजपणे फोडू शकते.

४) या यंत्राची अंदाजे किंमत रू. १२००/- प्रति नग आहे.

### ६) भूईमूग शेंगा तोडणी चौकट :



१) भूईमूग वेलापासून शेंगा तोडणीसाठी या यंत्राचा उपयोग होतो.

२) या चौकटीची शेंगा तोडणी क्षमता १०० टक्के आहे.

३) या चौकटीच्या चारही बाजूस बसून महिलांना शेंगा तोडता येतात.

४) या भूईमूग शेंगा तोडणी चौकटीची किंमत रू. ६५०/- प्रति नग आहे.

### ७) अतुल झेला :



१) फळांना इजा/दुखापत होत नाही.

२) चिकू, बोर, कागदी लिंबू यासारखी फळे जमिनीवरून काढता येतात.

३) फांद्या तुटत नाहीत.

४) वापरण्यास सुलभ आणि हलका आहे.

५) अंदाजे किंमत रू. १५५/- प्रति नग आहे.